CMYK


**महाराष्ट्राचा जर्मनीतील बाडेन बुटेनबर्ग राज्याशी कौशल्य वृध्दीबाबत झाला सामंजस्य करार** >> पान 2

**...अखेर राज्यसरकारचे तुपकरांना बैठकीचे निमंत्रण** >> पान 3

**प्रकाश डोंगरे विधानसभेच्या रिंगणात** >> पान 4



दैनिक

# आपला विदर्भ



**'लाडकी बहीण योजना' अर्ज प्रक्रियेत मोठा बदल; आता फक्त 'या' कर्मचाऱ्यांना दिले स्वीकारण्याचे अधिकार!**

आतील पान




**सुविचार**

आपली सावली निर्माण करायची असेल तर ऊन झेलण्याची तयारी असावी लागते.


apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 32 ■ रविवार, दि. 08 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# ऐन निवडणुकीच्या तोंडावरच कामाचे उद्घाटन कशासाठी!, जनतेची दिशाभूल तर होत नाही ना !

## निवडणुकीच्या तोंडावरच लोकप्रतिनिधी करतात जनतेशी संपर्क

सध्या महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका आहेत याच पार्श्र्वभूमीवर मेहकर विधानसभेची सुद्धा निवडणूक आहे मात्र निवडणुकीच्या दरम्यान विविध विकास कामाचे निवडणुकीच्या तोंडावरच उद्घाटन कसे होतात निवडणुकीच्या अगोदरही काही कामाचे उद्घाटन होत असते मात्र निवडणुका जवळ आल्या की उद्घाटन करण्याचा बाजार भरतो एकामागे एक असे उद्घाटन चालूच असतात मात्र ज्या कामाचे उद्घाटन झाले ते काम कधी मार्गी लागणार कामाला सुरुवात कधी होणार व काम पूर्ण कधी होणार याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध राहत नाही केवळ उद्घाटन करायचे एक बोर्ड त्या ठिकाणी लावायचे व नंतर त्या कामाकडे पाहायचेच नाही अशी परिस्थिती अनेक निवडणुकीच्या वेळेस दिसून येत आहे ही जनतेची दिशाभूल तर नाही ना असे म्हणण्याची वेळ सुद्धा येत आहे अनेक लोकप्रतिनिधी मग ते विद्यमान असो किंवा इच्छुक असो निवडणूक जवळ आली की जनतेशी जास्त संपर्क करतात प्रत्येक गावामध्ये स्वतः जाऊन जनतेला भेटतात अडीअडचणी जाणून घेतात मग ह्या अडीअडचणी पाच वर्षात नसतात का पाच वर्षात हे इच्छुक किंवा विद्यमान लोकप्रतिनिधी जनतेची संपर्क का ठेवत नाही असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे

सध्या मेहकर विधानसभेची निवडणूक सुरू होत आहे त्या दृष्टीने विद्यमान लोकप्रतिनिधी व इतर इच्छुक उमेदवार मतदारांच्या भेटीसाठी घेत आहेत मेहकर व लोणार तालुक्यातील अगदी शेवटच्या टोकापर्यंत जात आहेत प्रत्येक गावात जाऊन विचारपूस अडीअडचण चौकशी करत आहेत मग प्रश्न असा उपस्थित होतो की एकदा निवडून आल्यावर पाच वर्षे हे लोकप्रतिनिधी त्या गावात का जात नाहीत त्या त्या गावच्या समस्या साडी अडचणी जाणून का घेत नाहीत असा प्रश्न उपस्थित होत आहे या दरम्यान पाच वर्ष विविध गावात विकास कामे का करत नाहीत निवडणुकीच्या तोंडावरच अगदी एक ते दोन महिन्यात अनेक कामाचे उद्घाटन का करतात असे अनेक प्रश्न उपस्थित होतात निवडणुकीत मतदारांचा केवळ मतदानापुरता उपयोग करायचा का त्यानंतर पाच वर्ष त्यांच्या समस्या अडीअडचणी कोण सोडवणार असाही प्रश्न उपस्थित होत आहे मात्र काहीही असले तरी मेहकर मतदारसंघात निवडणुकीच्या हालचालींना वेग येत आहे विद्यमान लोकप्रतिनिधी व इच्छुक उमेदवार यांची मोठ्या प्रमाणात धावपळ दिसून येत आहे मात्र जनतेशी कितीही संपर्क केला व कितीही उद्घाटन केले तर जनता जनार्दन खूप हुशार झाली आहे कोणाला मतदान करायचे हे जनतेने अगोदरच ठरवून ठेवलेले असते मात्र लोक बोलून दाखवत नाहीत हे सर्वांनाच माहिती आहे तरीसुद्धा मीच कसा चांगला मीच विकास करू शकतो मीच तुमच्या कामी पडतो असे सांगत सर्वच जनतेशी संपर्क करत आहेत मात्र काहीही असले तरी अगदी निवडणुकीच्या तोंडावर होणारे विविध कामाचे उद्घाटन व जनतेशी वाढलेला इच्छुक व विद्यमान लोकप्रतिनिधीचा जनसंपर्क यामुळे उलट सुलट चर्चेला उधाण आले आहे









**देविदास खनपटे**
मुख्य संपादक





## पुणे-सातारा महामार्गावर उड्डाणपुलावरून दुचाकी कोसळून पती ठार

**दैनिक आपला विदर्भ**

**सातारा/प्रतिनिधी** : पुणे-सातारा महामार्गावर झालेल्या अपघातात खंडाळा येथे उड्डाणपुलावरून दुचाकी ७० फूट खाली कोसळून झालेल्या अपघातात पती ठार झाला. दुचाकीवरून दांपत्य कोल्हापूरला जात होते. भरधाव मोटारीने हुलकावणी दिल्याने दुचाकी सेवा रस्त्यावर कोसळली. यावेळी दांपत्य सेवा रस्त्यावरून कोसळून पतीचा जागीच मृत्यू झाला.पुणे सातारा महामार्गावर आज गणेशोत्सवामुळे वाहनांची मोठी गर्दी झाली आहे. या गर्दीतून खंडाळा उड्डाणपुलावरून पुण्याहून कोल्हापूरला जात असताना भरधाव मोटारीने हुलकावणी दिल्याने दुचाकी चालकाने जोरात ब्रेक दाबला. त्यामुळे दुचाकी उड्डाणपुलावर अडकली. दोघेही खाली सेवा रस्त्यावर कोसळले. त्यात पतीचा जागीच मृत्यू झाला. हि घटना दुपारी साडेबारा वाजता घडली.

उपेंद्र नागेश चाटे (वय ४०)असे मृत्युमुखी पडलेल्या इसमाचे नाव आहे. उन्नती उपेंद्र चाटे या गंभीर जखमी झाले असून त्यांना साताऱ्यातील क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघात झाल्यानंतर खंडाळा पोलीस तात्काळ अपघात स्थळी उपस्थित झाले भर दुपारी गणेशोत्सवात अपघात घडल्याने बघ्यांनी मोठी गर्दी केली होती.

## टीबी रुग्णांसाठी मोठी बातमी, अधिक प्रभावी उपचारांना सरकारची मान्यता

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : देशात टीबीच्या रुग्णांमध्ये कमालीची घट झाली असून २०२५ पर्यंत हा आजार पूर्णपणे नष्ट करण्याचे भारत सरकारचे उद्दिष्ट आहे. भारत सरकारही यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने पावले उचलत, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने भारतात टीबीच्या प्रतिबंधासाठी आणि चांगल्या उपचारांसाठी नवीन लहान आणि अधिक प्रभावी उपचार सुरू करण्यास मान्यता दिली.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने मंजूर केलेला नवीन उपचार म्हणजे बीपीएएलएम पथ्ये, ज्यामध्ये चार औषधांचा समावेश आहे. आरोग्य मंत्रालयाचे म्हणणे आहे की बेडाक्विलिन, प्रीटोमॅनिड, लाइनझोलिड आणि मोक्सीफ्लॉक्सासिन मागील शीं-टीबी उपचार प्रक्रियेपेक्षा सुरक्षित, अधिक प्रभावी आणि जलद उपचार प्रदान करतील. यामुळे क्षयरोगावर जलद आणि प्रभावीपणे उपचार करण्यात मदत होईल आणि २०२५ पर्यत क्षयरोगाचे उच्चाटन करण्याचे उद्दिष्टही बळकट होईल.



केंद्र सरकारचे म्हणणे आहे की हे पाऊल भारतातील क्षयरोगाचे उच्चाटन करण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करण्यासाठी खूप पुढे जाईल आणि देशाच्या प्रगतीला देखील चालना देईल.

सरकार टीबीच्या प्रतिबंध आणि उपचारांसाठी पावले उचलत आहे, परंतु कध अहवालानुसार, २०२२ मध्ये जगभरात एक कोटीहून अधिक टीबी रुग्णांची नोंद झाली आहे. त्यापैकी २७ टक्के भारतीय होते. २०२२ मध्ये २८ लाख भारतीय टीबीने बाधित होतील. २०२२ मध्ये टीबीमुळे मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या जगभरात सुमारे १३ लाख होती. ही आकडेवारी पाहता डब्ल्यूएचओ म्हणते की टीबी हा कोविड-१९ नंतरचा सर्वात संसर्गजन्य आजार आहे. ज्यांच्या मृत्यूची संख्या खूप जास्त आहे.

तथापि, भारतात, जिथे २०२१ मध्ये क्षयरोगामुळे सुमारे ५ लाख लोकांना आपला जीव गमवावा लागला होता, तिथे २०२२ मध्ये टीबीमुळे मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या ३.३१ लाखांवर आली. पण आजही भारतासाठी ही एक मोठी आरोग्य समस्या आहे, तिच्या निराकरणासाठी आणखी प्रयत्न आणि चांगल्या उपचारांची गरज आहे.

## शरद पवारांचा खास माणूस पोहोचला मुख्यमंत्री शिंदेंच्या घरी

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. अशातच शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे आमदार आणि माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे. आज गणेशोत्सव निमित्ताने त्यांची भेट घेतली, अशी प्रतिक्रिया आव्हाड यांनी दिली. पण आव्हाड यांच्या या भेटीमुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

आज ठाण्यात आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घरी जाऊन भेट घेतली. या भेटीत दोन्ही नेत्यांचे बोलणे झाले. पण या भेटीतला तपशील बाहेर आला नाही. आव्हाड जेव्हा मुख्यमंत्री शिंदेंच्या घरातून बाहेर पडले, त्यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

''गणपती बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी आलो होतो. आज गणरायाचे आगमन झाले आहे. त्यानंतर दहा दिवस मोठी गर्दी असते. त्यामुळे आज दर्शन घेण्यासाठी आलो. मुख्यमंत्री शिंदे यांची गाडी येताना पाहिली होती. त्यानंतर मी त्यांच्या घरी गेलो. गणरायाचे दर्शन घेतले. त्यांना शुभेच्छा दिल्यात. मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा कशी होणार? त्यांच्या घरी गर्दी खूप होती. पण कोणतीही अशी राजकीय चर्चा झाली नाही,'' अशी प्रतिक्रिया आव्हाड यांनी दिली.

''आमचे वैचारिक मतभेद आहेत पण मैत्री आहेत. आमची मैत्री आहे पण मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांचे मित्र वाढले आहे,'' असेही आव्हाड म्हणाले.

'घर फोडू नका, मी चुकलो आहे', असे वक्तव्य अजित पवार यांनी केले होते. याबद्दल पत्रकारांनी विचारले असता आव्हाड म्हणाले की, 'खोलवर झालेल्या जखमेचा व्रण जात नाही. वरती ती दिसत असते, पण व्रण जात नाही.'

'मुख्यमंत्रिपदासाठी उद्धव ठाकरे हा चेहरा शरद पवारांच्या मनात नाही, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. त्याबद्दल आव्हाड यांना विचारले असता आव्हाड म्हणाले की, ''शरद पवारांच्या मनात काय हे त्यांच्या बायकोला समजत नाही. हे देवेंद्र फडणवीस यांना काय समजणार आहे. ते शरद पवार आहे, गेल्या ७० वर्षांमध्ये त्यांच्या मनात काय आहे हे उभ्या महाराष्ट्राला माहिती नसते तर देवेंद्र फडणवीस यांना काय माहिती असणार, ते शरद पवार, हे लक्षात ठेवा' असे म्हणत आव्हाडांनी फडणवीसांना टोला लगावला.



तसंच, सुप्रिया सुळे यांचे तसे वक्तव्य नव्हते, त्या असे कधीच बोलत नाहीत, पत्रकारांनी चुकीची माहिती दिली, असेही आव्हाड म्हणाले.

CMYK

## मेलडी क्वीन आशाताई

गेली सात दशके आपल्या स्वरांनी चाहत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आणि असंख्य संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणाऱ्या जेष्ठ अष्टपैलू गायिका, मेलडी क्वीन आशा भोसले यांचा आज वाढदिवस. आशाताईंचा आज ९१ वा वाढदिवस आहे असे सांगितले तर कोणाचा विश्र्वासही बसणार नाही. कारण आपल्या आवाजाप्रमाणे कायम चिरतरुण असणाऱ्या आशाताईंमध्ये आजही वीस वर्षाच्या तरुणीला मागे पाडेल एवढी ऊर्जा आहे. वयाच्या ९१ व्या वर्षीही त्यांच्यात गाण्याची, स्वर उंचावण्याची क्षमता एवढी आहे की आजही त्यांच्या आसपास कोणतीही गायिका फिरू शकत नाही. आपल्या सात दशकांच्या संगीत कारकिर्दीत त्यांना भारतरत्न सोडता सर्वच पुरस्कार मिळाले. मागील वर्षी आशा भोसले यांना प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने महाराष्ट्र सरकारतर्फे गौरविण्यात आले तेंव्हा संगीत प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, शिक्षण मंत्री दीपक केसरकर तसेच भारतरत्न सचिन तेंडुलकर उपस्थित होते. आशा भोसले यांचे संगीत क्षेत्रात खूप मोठे योगदान आहे. आशा भोसले यांनी गेली सत्तर वर्ष संगीत कलेची जी सेवा केली आहे त्याचीच पोचपावती म्हणजे त्यांना मिळालेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार. ८ सप्टेंबर १९३३ रोजी जन्मलेल्या आशाताईंना संगीताचे बाळकडू त्यांच्या घरातच मिळाले. १९४३ साली माझा बाळ या चित्रपटात दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेल्या चला चला नव बाळा... या गाण्याने आशाताईंनी चित्रपट गायनाला प्रारंभ केला. वयाच्या पंधराव्या वर्षीच म्हणजे १९४८ साली हंसराज बहल यांच्या चुनरिया या चित्रपटात सावन आया हे गाणे गाऊन त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. १९५३ साली बिमल रॉय यांनी त्यांना आपल्या परिणिता या चित्रपटातील गाणी गाण्याची संधी दिली. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५४ साली राज कपूर यांनी बूट पॉलिश या चित्रपटात मोहम्मद रफी यांच्यासोबत नन्हे मुन्ने बच्चे तेरे मुठ्ठी मे क्या है गायला दिले. १९५६ साली सीआयडी हा चित्रपट आला या चित्रपटातील त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. १९५७ साली आलेल्या नया दौर या चित्रपटातील गाणी तर खूपच लोकप्रिय झाली आणि सर्वत्र आशाताईंचे नाव झाले. आशाताई हिंदी चित्रपट सृष्टीतील आघाडीची गायिका म्हणून नावारूपास आल्या. त्या काळातील सर्वच संगीतकारांची गाणी त्यांनी गायली. मागील सत्तर वर्षात असा एकही संगीतकार नसेल ज्यांनी आशाताईंना आपल्यासाठी गाण्याची विनंती केली नसेल. १९४८ पासून सुरू झालेला आशाताईंच्या संगीत कलेचा प्रवास आजही अखंडपणे सुरू आहे. आशा भोसले यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तामिळ, मल्याळम, इंग्रजी, रशियन अशा विविध भाषेत सोळा हजारांहून अधिक गाणी गायली आहेत. त्यांनी एक हजारांहून अधिक चित्रपटासाठी गायन केले. हिंदी चित्रपटसृष्टीतील गायनासाठी त्यांना सात वेळा फिल्मफेअर पुरस्कार तर दोनवेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. २००० साली त्यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्काराने तर २००८ साली मानाच्या पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. २०११ साली सर्वाधिक गाणी गाण्याचा विश्र्वविक्रम त्यांनी केला. त्यांच्या या विश्र्वविक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. आशा भोसले यांनी सर्वप्रकारची गाणी गायली आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीवर सुरवातीच्या काळात लता मंगेशकर यांचा वरचष्मा होता. तेंव्हा दुसऱ्या गायिकांना संधी मिळणे अवघड होते हे ओळखून त्यांनी वेगळा मार्ग पत्करला. ज्या प्रकारची गाणी लता मंगेशकर गायच्या त्या प्रकारची गाणी सोडून अन्य प्रकारची गाणी त्यांनी गायला सुरवात केली. यात पॉप तसेच पाश्र्चिमात्य सुरावट असलेल्या गाण्यांचा समावेश होता. त्या गाण्यांनी युवकांवर मोहिनी घातली. त्यांनी गायलेले गझल, मुजरे आणि भजनेही लोकप्रिय झाली. संगीतातला कुठलाही प्रकार त्यांनी गायचा सोडला नाही. आशा भोसले यांनी अनेक भाषेत गाणी गायली असली तरी त्यांनी मराठीत सर्वाधिक गाणी गायली आहेत ते स्वाभाविकही आहे त्यांचे बंधू हृदयनाथ मंगेशकर यांच्यासाठी त्यांनी अनेक गाणी गायली आहेत. मलमली तारुण्य माझे, तरुण आहे रात्र अजूनी, मी मज हरपून बसले ग ही त्यांची गाणी इतकी लोकप्रिय आहेत की अजूनही ती स्मरणात आहे. कुठल्याही कार्यक्रमात ही गाणी अजूनही म्हटली जातात. त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली आहेत. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या आशाताई म्हणजे आधुनिक काळातील एक आश्र्चर्य आहे. आशाताईंना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# महाराष्ट्राचा जर्मनीतील बाडेन बुटेनबर्ग राज्याशी कौशल्य वृध्दीबाबत झाला सामंजस्य करार

## विविध क्षेत्रातील १० हजार कुशल तंत्रज्ञ/युवकांना मिळणार जर्मनीत रोजगाराची संधी

युरोपियन युनियन मधील बहुतांशी देश औद्योगिकदृष्ट्या संपन्न आहेत. तथापि मागील काही वर्षापासून या देशांना कुशल मनुष्यबळाची कमतरता भासत आहे. महाराष्ट्र राज्यात विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. या मनुष्यबळासाठी एकतर तुलनेने रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध आहेत, शिवाय जे काही रोजगार उपलब्ध आहेत त्यातून समाधानकारक अर्थार्जन होत नसल्याचे दिसून आले आहे. राज्यात उपलब्ध असलेल्या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा युरोपियन युनियन मधील देशांना करता यावा व त्यायोगे त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत व्हावी आणि दोन्ही देशांमधील संबंध सदृढ होतील व अनेक सशक्त सामाजिक व आर्थिक बदलांची सुरुवात जागतिक स्तरावर होऊन मोठ्या प्रमाणात परकीय चलन व तंत्रज्ञान प्राप्त होईल हा शासनाचा दृष्टीकोन आहे.

यासाठी मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली या विभागाच्या दि.३१ मे २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये कृतीदलाचे गठन करण्यात आले होते. या कृतीदलात या विभागाबरोबरच उच्च व तंत्र शिक्षण, कौशल्य विकास व उद्योजकता, उद्योग, कृषी व वैद्यकीय शिक्षण या विभागांच्या मंत्री महोदयांचा व सचिवांचा समावेश आहे.

कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करण्यासाठी कार्यपध्दती निश्र्चित करण्याची जबाबदारी या कृतीदलाकडे सोपविण्यात आली होती. सन २०१५ मध्ये जर्मनीतील बाडेन बुटेनबर्ग या राज्याशी डळींशी डींरींश ठशश्ररींळेपीहळ अंतर्गत महाराष्ट्र राज्याने कौशल्य वृध्दीबाबत सामंजस्य करार केला असल्याची पार्श्र्वभूमी विचारात घेऊन व या राज्याची कुशल मनुष्यबळाची मोठी गरज विचारात घेऊन त्या राज्यास कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणे उचित ठरेल या विचारांती कृती दलाने त्या दृष्टीने प्रयत्न केले. यासाठी दोन्ही बाजूच्या बैठका संपन्न झाल्या. बाडेन बुटेनबर्ग या राज्याशी सामंजस्य करार करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयास सादर करण्यात आला व त्यांच्या मान्यतेनंतर दोन्ही राज्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दि.२५ फेब्रुवारी २०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आला.

हा करार करण्यात आल्यानंतर कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असलेली क्षेत्रे निश्र्चित करणे, प्रत्यक्ष काम करण्यासाठी किमान कौशल्याची निश्र्चिती करणे, कुशल मनुष्यबळाच्या स्थानांतरणासाठी व्हिसा व रहिवास याबाबत धोरण निश्र्चिती, जर्मन भाषेचे व आवश्यक शिष्टाचाराचे प्रशिक्षण इत्यादी अनेक बाबतीत निर्णय होणे आवश्यक आहे. यासाठी मंत्री (शालेय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधित विभागातील उच्च पदस्थ अधिकाऱ्यांचा समावेश असलेले शिष्टमंडळ दि.११ जून २०२४ ते दि.१५ जून २०२४ या कालावधीत बाडेन वुटेनबर्ग या राज्याच्या दौऱ्यावर गेले होते. अर्थात वर उल्लेख करण्यात आलेल्या सर्व बाबींसाठी काहीसा कालावधी लागणार आहे. हे स्पष्ट आहे. तथापि, आरोग्य क्षेत्रासह परिवहन, विविध उद्योगातील तंत्रज्ञ इत्यादीसाठी कुशल मनुष्यबळाचा पुरवठा प्राधान्याने होणे आवश्यक असल्याची बाब निदर्शनास आली. त्यामुळे पथदर्शी तत्वावर सुरुवातीस विविध क्षेत्रातील किमान १०,००० कुशल मनुष्यबळ तातडीने त्या राज्यास उपलब्ध करुन द्यावे, असे प्रस्तावित होते. या विभागामार्फत यापूर्वी उच्च माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायीकरण ही केंद्र पुरस्कृत योजना राबविली जात असे. या योजनेनुसार शिक्षणातून रोजगार, स्वयंरोजगार, उद्योग व व्यवसाय यासाठीच्या संधी निर्माण करण्याचे उद्दिष्ट बाळगण्यात आले होते. प्रस्तावांतर्गत पथदर्शी प्रकल्पाचे उद्दिष्ट तशाच स्वरूपाचे असल्याने या योजनेचा विस्तार करून हा पथदर्शी प्रकल्प राबविण्यास शासनाने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या कौशल्य २०२४/प्र.क्र.५१/एसडी.-६, दि.११ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार मान्यता दिली आहे. उच्च माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायीकरण या योजनेचा विस्तार करून जर्मनीतील बाडेन- वुटेनबर्ग या राज्यास महाराष्ट्रातील खालील विविध क्षेत्रातील १०,००० कुशल मनुष्यबळ पुरविण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पाच्या अनुषंगाने यंत्रणा, प्रशिक्षण व्यवस्था व कार्यपध्दती निश्र्चित करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

**हेल्थ केअर मधील व्यवसाय :-**

* परिचारिका (रुग्णालय)/वैद्यकीय
* सहायक (MFA)
* प्रयोगशाळा सहायक
* दंत सहायक
* आजारी व वृध्द नागरिकांची काळजी घेणारा
* फिजिओथेरपिस्ट
* दस्तऐवजीकरण आणि कोडिंग/त्रयस्थ प्रशासन
* लेखा आणि प्रशासन

आदरातिथ्य क्षेत्रातील व्यवसाय

* सेवक/वेटर्स
* रिसेप्सनिस्ट
* स्वयंपाकी
* हॉटेल व्यवस्थापक
* लेखापाल
* घरकाम करणारे/सफाई कामगार व्यवसायिक कारागीर
* इलेक्ट्रिशियन
* अक्षय/अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रात काम करणारे इलेक्ट्रिशियन विशेष
* हिटिंग तंत्रज्ञ
* चित्रकार
* सुतार
* विटा/टाईल लेअर्स मेसन
* प्लंबर
* वाहन दुरुस्तीसाठी यांत्रिकी (हलके व जड वाहन)

इतर

* चालक (बस/ट्रॅम/ट्रेन/ट्रक)
* सुरक्षा
* वितरण (टपाल सेवा)
* पॅकर्स आणि मूव्हर्स
* विमानतळावरील सपोर्ट क्लिनर सामान हाताळणारे
* घरकाम
* विक्री सहायक
* वेअर हाऊस मदत

२. यंत्रणा, कार्यपध्दती व प्रशिक्षण :-

१) यंत्रणा :-

अ) जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती :- या प्रकल्पाच्या जिल्हास्तरीय सनियंत्रणासाठी व संचालनासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

१) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था- मुख्य समन्वयक
२) जिल्हा शल्यचिकित्सक-सदस्य
३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता (असल्यास)-सदस्य
४) जिल्हा आरोग्य अधिकारी-सदस्य
५) प्रादेशिक परिवहन अधिकारी- सदस्य
) प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व पॉलिटेक्निक संस्था-सदस्य
७) सहायक कामगार आयुक्त-सदस्य
८) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) -सदस्य

ब) राज्यस्तरीय सनियंत्रण समिती :- या प्रकल्पाच्या राज्यस्तरीय सनियंत्रणासाठी व संचालनासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

१) मा.मंत्री (शालेय शिक्षण)-अध्यक्ष
२) आयुक्त, परिवहन-सदस्य
३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण-सदस्य
४) आयुक्त, कौशल्य विकास-सदस्य
५) आयुक्त, कामगार-सदस्य
६) आयुक्त, शिक्षण-सदस्य
७) संचालक, तंत्रशिक्षण-सदस्य
८) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-सदस्य सचिव

**क) तांत्रिक समिती :-**

उमेदवारांना आवश्यकतेनुसार कौशल्य वृध्दीसाठी अतिरिक्त प्रशिक्षण आवश्यक आहे. यासाठी खालीलप्रमाणे ट्रेडनिहाय तांत्रिक समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

१) परिचारिका, वैद्यकीय सहाय्यक प्रयोगशाळा सहायक, रेडिओलॉजी सहायक, दंतचिकित्सा सहायक, आजारी व वृध्द व्यक्तींचा काळजीवाहक (उरीशींरज्ञशी), दस्तऐवज व कोडींग/)त्रयस्थ प्रशासन (Documentation and Coding/Third Party Administration) वैद्यकीय लेखा व प्रशासन- या तांत्रिक समितीसाठी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण हे अध्यक्ष असतील.

२) सेवक (Servant), वेटर (Waiter) स्वागतकक्ष संचालक (Receptionist), स्वयंपाकी (Cook), हॉटेल व्यवस्थापक (Hotel Manager), लेखाधिकारी (Accountant), स्वच्छक (House Cleaner), गोदाम व्यवस्थापक (Godawn Asst.), विक्री सहायक (Sales Asst.)- या तांत्रिक समितीसाठी आयुक्त, कौशल्य विकास हे अध्यक्ष असतील.

३) वीजतंत्री (Electrician), अक्षय उर्जे साठीचा वीजतंत्री (Electrician Specialized in Renewable energy), औष्णिक वीजतंत्री (Heating Technician), रंगारी (Painter), सुतार (Carpenter), गवंडी काम, नळ जोडणी (Plumber), हलक्या व जड वाहनांचा तंत्रज्ञ (Mechanic)- या तांत्रिक समितीसाठी संचालक, तंत्रशिक्षण हे अध्यक्ष असतील.

४) वाहनचालक(बस, रेल्वे, हलकी व जड वाहने)- या तांत्रिक समितीसाठी आयुक्त, परिवहन हे अध्यक्ष असतील.

५) सुरक्षा रक्षक, टपाल सेवा (delivery) सामान बांधणी व वाहतूक (Packers and Movers), विमानतळावरील सामान हाताळणी- या तांत्रिक समितीसाठी आयुक्त कामगार हे अध्यक्ष असतील. त्या-त्या तांत्रिक समित्यांच्या अध्यक्षांना समितीतील इतर सदस्य निवडण्याची मुभा असेल.

२) प्रशिक्षण:- जर्मनीतील बाडेन युटेनबर्ग राज्यास जे कुशल मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावयाचे आहे, त्यास जर्मन भाषा व शिष्टाचार तसेच आवश्यकतेनुसार कौशल्य वृध्दी (Up Skilling) चे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

**अ) जर्मन भाषेचे किमान पर्याप्त प्रशिक्षण:**

जर्मन भाषेचे प्रशिक्षण देणारी GOETHE Institute ही प्रख्यात संस्था असून ही संस्था खुद्द Federal Republic of German व European Union यांच्या सहकार्याने चालविली जाते. या संस्थेकडे वेगवेगळे व्यवसायनिहाय चेर्वीश्रश तयार करुन प्रशिक्षण देण्याचा ६० वर्षाहून अधिक कालावधीचा अनुभव आहे. प्रशिक्षण साहित्य, ऑनलाईन ग्रंथालय, अनुभवी शिक्षक इत्यादी यंत्रणा संस्थेकडे उपलब्ध आहे.

प्रशिक्षणानंतर परिक्षेचे आयोजन व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करणे ही कामे देखील संस्थेमार्फत पार पाडली जातात. GOETHE Institute ही संस्था खुद्द Federal Republic of German यांच्या सहकार्याने कार्यरत असल्याने या संस्थेने बहाल केलेली प्रमाणपत्रे त्या देशात वैध मानली जातात.

राज्यातील कुशल मनुष्यबळास रोजगार प्राप्त व्हावा व त्याबरोबरच त्यांना चांगले वेतनमान मिळावे व एकूणच त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचवावा यासाठी राज्य शासनाने केलेला सामंजस्य करार हा अत्यंत महत्वपूर्ण आहे.

तक्त्यात नमूद केलेली विविध क्षेत्रातील ३० ढीरवशी मधील कौशल्यधारकांची तातडीने गरज असल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत GOETHE Institute या संस्थेमार्फत पथदर्शी तत्वावर विविध क्षेत्रातील किमान १०,००० उमेदवारांना जर्मन भाषेचे प्रशिक्षण देण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

कुशल मनुष्यबळाला जर्मन भाषा शिकविण्यासाठी GOETHE Institute यांच्याकडून ठराविक कालावधीनंतर घेतले जाणारी --१, --२, इ-१ व इ-२ या चार स्तर निहाय परिक्षा क्रमाने उत्तीर्ण होणे अपेक्षित आहे. जर्मन भाषा शिकविण्यासाठी २५ विद्यार्थ्यांसाठी एक प्रशिक्षण वर्ग याप्रमाणे १०,००० विद्यार्थ्यांसाठी ४०० प्रशिक्षण वर्गाची आवश्यकता आहे. यासाठी अंदाजे रु.३३.०० कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. यात प्रशिक्षण शुल्क, अध्ययन साहित्य, परिक्षा फी व प्रमाणपत्र याबाबतच्या खर्चाचा समावेश आहे. त्याचप्रमाणे २०० प्रशिक्षण वर्ग खोल्यांसाठी आवश्यक सोयी सुविधांचा खर्च प्रति वर्ग अंदाजे रु.१.५० लाख या दराने रु. ३.०० कोटी इतका आहे. अशा प्रकारे जर्मन भाषा प्रशिक्षणाचा एकूण खर्च अंदाजे रु.३६.०० कोटी इतका आहे.

**(ब) क्षेत्रनिहाय कौशल्य वृध्दी (Up Skilling) साठी अतिरिक्त प्रशिक्षण :-**

बाडेन वुटेनबर्ग राज्यास उपलब्ध करुन द्यावयाच्या मनुष्यबळास त्या राज्यातील अनुरुप कौशल्याशी संबंधित पात्रता मिळविण्यासाठी जे अतिरिक्त तांत्रिक प्रशिक्षण देणे आवश्यक आहे, त्याकरिता सुयोग्य यंत्रणेची उभारणी क्रमप्राप्त आहे. दोन्ही ठिकांणामधील तांत्रिक पात्रतांधील फरक ओळखून त्याचे प्रशिक्षण देणाऱ्या व शासनाच्या अटी शर्ती प्रमाणे काम करणाऱ्या शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित संस्थांनी असे प्रशिक्षण देण्याची तयारी दर्शविल्यास त्यांना प्रति विद्यार्थी मोबदला म्हणून काही रक्कम देणे आवश्यक आहे. जर्मनीतील बाडेन बुटेनबर्ग येथे फार मोठ्या संख्येने अशा कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने मोठ्या संख्येने अशा संस्थांची कौशल्यनिहाय नेमणूक करणे ही तातडीची बाब ठरते.

याकरिता अशा प्रकारच्या संस्थांना प्रति महिना प्रति विद्यार्थी ग्रामीण भागासाठी (सर्व महानगरपालिका कार्यक्षेत्रे वगळून) रु.७,०००/- व शहरी भागासाठी (सर्व महानगरपालिका कार्यक्षेत्रे) रु.१०,०००/- इतके अनुदान देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. यात अपेक्षित कौशल्यवृध्दी, वास्तव्य, न्याहारी, भोजन व इतर अनुषंगीक खर्चाचा समावेश आहे. वर उल्लेख करण्यात आल्याप्रमाणे पहिल्या टप्यात पथदर्शी तत्वावर १०,००० मनुष्यबळास असे प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावित असल्यामुळे तसेच प्रशिक्षणाचा कालावधी अंदाजे किमान ४ महिने इतका गृहित धरल्यास यासाठीचा एकूण खर्च अंदाजे रु.४०.०० कोटी इतका राहील.

इच्छुक शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित संस्थांनी यासाठी कशा प्रकारे अर्ज करावेत, त्यांची निवड कोणत्या निकषांवर होईल याबाबत तसेच यासंदर्भातील एकूण कार्यपद्धतीबाबत उपरोक्त परि. २ (१) (क) मध्ये नमूद तांत्रिक समिती निर्णय घेईल.

**३) कार्यपध्दती व अंमलबजावणी :-**

राज्यस्तरीय सनियंत्रण समिती या प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे नियंत्रण व देखरेख करेल.

**अ. व्यवस्था निर्माण करण्यासाठी कृती :-**

कौशल्यनिहाय नेमक्या किती मनुष्यबळाची आवश्यकता आहे याची माहिती जर्मनीतील बाडेन बुटेनबर्ग राज्याकडून वेळोवेळी घेणे व ती संकलित करुन त्या- त्या वेळी अद्ययावत करण्याची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची असेल.

महाराष्ट्रातील अधिकाधिक युवक / युवतींना या प्रकल्पाची माहिती व्हावी, यासाठी या प्रकल्पाचा व्यापक प्रचार व प्रसार करण्याची जाबबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची असेल.

या प्रकल्पाशी संबंधित सर्व विभाग, समित्या व कार्यालये यांना परस्पराशी संपर्क साधण्यासाठी तसेच प्रत्येक प्रशिक्षणार्थीची संपूर्ण माहिती एकत्रित स्वरूपात साठविण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत ऑनलाईन व्यवस्था विकसित करण्यात येईल.

प्रशिक्षणासाठी इच्छुक उमेदवारांच्या नोंदणीसाठी गुगल फॉर्मचा मसूदा अंतिम करण्याची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची असेल,

**ब. जर्मन भाषेच्या प्रशिक्षणासाठी कृती :-**

प्रत्येक जिल्हा स्तरावर प्रशिक्षणासाठी सुयोग्य वर्गखोल्यांची निवड जिल्हा सनियंत्रण समिती / प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्यामार्फत करण्यात येईल.

GOETHE Institute यांनी मान्य केलेल्या विनिर्दिष्टांनूसार प्रशिक्षणासाठी आवश्यक सुविधा / साहित्य (जसे मॉनिटर, प्रोजेक्टर इत्यादी) यांचा पुरवठा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या नियंत्रणाखाली व मार्गदर्शनानुसार जिल्हा सनियंत्रण समितीमार्फत करण्यात येईल.

जर्मन भाषा प्रशिक्षणासाठी GOETHE Institute सोबत सामंजस्य करार करण्याची जबाबदारी संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांची असेल.प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी जर्मन भाषेचे प्रशिक्षक त्या-त्या विशिष्ट कालावधीसाठी नेमण्याची जबाबदारी GOETHE Institute यांची असेल.

विशिष्ट जिल्ह्यातील विशिष्ट कालावधीतील जर्मन भाषा प्रशिक्षणाच्या विशिष्ट वर्गासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना नोंदणी करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत गुगल फॉर्म प्रसिध्द करण्यात येईल. अशी नोंदणी सातत्याने सुरु राहील.

गुगल फॉर्मद्वारे प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे प्राथमिक छाननीनंतर प्रत्येक जिल्ह्यासाठी कौशल्यनिहाय स्वतंत्र यादी तयार करण्याची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या निर्देशानुसार जिल्हा सनियंत्रण समितीची असेल. उमेदवारांची निवड करताना गुणवत्ता व अनुभव या घटकांना प्राधान्य देण्यात यावे. उमेदवाराच्या निवडीसाठी महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र त्याने धारण करणे अनिवार्य असेल.

वरीलप्रमाणे निवड झालेले उमेदवार, प्रशिक्षक, वर्गखोल्यांची उपलब्धता इत्यादी सर्व बाबींचा योग्य तो समन्वय साधण्याची जबाबदारी जिल्हा सनियंत्रण समिती व GOETHE Institute यांची असेल.

**योग्य त्या प्रशिक्षणानंतर उमेदवारांसाठी**

--२ प्रमाणपत्र परिक्षा आयोजित करणे व या परिक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांची यादी जिल्हा सनियंत्रण समितीस सोपविणे तसेच अनुत्तीर्ण प्रशिक्षणार्थीसाठी स्वतंत्र व सुयोग्य योजना तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे, ही जबाबदारी GOETHE Institute यांची असेल.

--२ प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांची यादी आवश्यक त्या तपशीलासह राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेस उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी जिल्हा सनियंत्रण समितीची असेल.

**क. कौशल्य वृध्दी प्रशिक्षणासाठी कृती :-**

एखाद्या ट्रेड च्या संदर्भात बाडेन बुटेनबर्ग राज्याचा अभ्यासक्रम व महाराष्ट्राचा अभ्यासक्रम यात तफावत असल्यास ती दूर करण्यासाठी कौशल्य वृध्दी प्रशिक्षणाची आवश्यकता भासणार आहे. यानुषंगाने नेमका अभ्यासक्रम तयार करण्यासाठी जर्मनीतील संबंधित यंत्रणेशी संपर्क साधणे व आवश्यकता भासल्यास त्यांच्या महाराष्ट्र भेटीची नियोजन करण्याची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची असेल.

एखाद्या विशिष्ट ट्रेडच्या दोन्ही पक्षांच्या अभ्यासक्रमातील व अर्हतामधील तफावत शोधण्यासाठी त्या-त्या विभागाच्या तांत्रिक समित्यांनी अभ्यासगट नेमावेत.

तफावत दूर करण्यासाठी व प्रशिक्षण आराखडा तयार करून त्यास जर्मनीतील संबंधित यंत्रणेची मान्यता घेण्याची जबाबदारी त्या-त्या विभागाच्या तांत्रिक समित्यांची असेल.

प्रशिक्षण आराखड्यानुसार त्या-त्या ट्रेडमधील कौशल्यधारकांना प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हास्तरावर अनुरूप प्रशिक्षण संस्थेची निवड करुन प्रशिक्षण देण्याची जबाबदारी त्या-त्या विभागाच्या तांत्रिक समित्यांची असेल. यासाठी परि.२ (ब) मध्ये नमूद पध्दतीचे अवलोकन करावे.

कुशल मनुष्यबळाची भरती करु इच्छिणाऱ्या जर्मन कंपन्यांची यादी तयार करुन ती वेळोवेळी अद्ययावत करण्याची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांची असेल, यासाठी जर्मनीतील संबंधित यंत्रणांशी त्यांनी समन्वय साधावा. सदर यादी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत त्या-त्या ट्रेडशी संबंधित तांत्रिक समित्यांना पाठविण्यात येईल.

--२ प्रमाणपत्र धारक प्रशिक्षणार्थीची जिल्हानिहाय व कौशल्यनिहाय यादी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत त्या-त्या समित्यांकडे पाठविण्यात येईल व संबंधित जिल्ह्यात कौशल्य वृध्दीसाठी प्रशिक्षण वर्ग चालू करण्याची सूचना या समित्यांना देण्यात येईल.

त्या-त्या ट्रेडशी संबंधित तांत्रिक समित्या प्रशिक्षणार्थी व निवड करण्यात आलेल्या अनुरूप प्रशिक्षण संस्था यांच्याशी योग्य तो समन्वय साधून कौशल्य वृध्दीचे प्रशिक्षण वर्ग चालू करतील.

कौशल्य वृध्दी प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सर्व प्रशिक्षणार्थीची पात्रता तपासण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था संबंधित तांत्रिक समितीने प्रशिक्षण संस्थेच्या मदतीने उभारावी तसेच पात्र उमेदवारांची यादी तयार करावी. त्याचप्रमाणे अपात्र ठरलेल्या प्रशिक्षणार्थी अतिरीक्त प्रशिक्षण देण्याची व त्यांची फेर परीक्षा घेण्यासाठी आवश्यक उपाययोजना करावी.

कौशल्य वृध्दी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थीना बाडेन बुटेनबर्ग राज्यात रोजगार / नोकरी मिळण्यासाठी संबंधित तांत्रिक समिती जर्मनीतील यंत्रणेशी संपर्क करुन त्यांचे संमतीपत्र प्राप्त

मनोज सुमन शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी
ठाणे

>> पान ३

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# ...अखेर राज्यसरकारचे तुपकरांना बैठकीचे निमंत्रण

## उपमुख्यमंत्री अजित पवारांसोबत ११ सप्टेंबरला बैठक; पालकमंत्री ना.दिलीप वळसे पाटील व कृषि ना.धनंजय मुंडे यांची मध्यस्थी

## रविकांत तुपकरांचे अन्नत्याग आंदोलन तूर्त स्थगित; शेतकरी महिलेच्या हस्ते सोडले उपोषण

## उद्याचे आंदोलन तूर्त स्थगित; ११ सप्टेंबरच्या बैठकीत ठोस निर्णय न झाल्यास १२ सप्टेंबर पासून आक्रमकपणे रस्त्यावर उतरणार – तुपकर

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**सिंदखेडराजा** : सोयाबीन–कापूस दरवाढ, पिकविमा,अतिवृष्टीची १००% नुकसान भरपाई, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती, जंगली जनावरांपासून सरंक्षणासाठी शेतीला मजबूत कंपाऊंड, यासह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी रविकांत तुपकर यांनी सिंदखेडराजात गेल्या चार दिवसांपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले हते. दरम्यान शासनाने या आंदोलनाची दखल घेतली असून राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी मागण्यासंदर्भात ११ सप्टेंबर रोजी मुंबई येथे बैठक बोलावली आहे. ना.पवार व संबंधित विभागाचे मंत्री अधिकारी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या बैठकीला रविकांत तुपकर यांना चर्चेसाठी बोलावण्यात आले असून प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीचे पत्र उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी रविकांत तुपकरांना बैठकीच्या निमंत्रणाचे लेखी पत्र दिले.

जिल्ह्याचे पालकमंत्री ना.दिलीप वळसे पाटील व कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी या बैठकीसाठी मध्यस्थी केली आहे. शासनाने आंदोलनाची दखल घेऊन तुपकरांना चर्चे साठी बोलाविले आहे, त्यामुळे आंदोलन मागे घ्यावे अशी विनंती शेतकरी व सहकाऱ्यांनी केल्यानंतर रविकांत तुपकर यांनी आंदोलन स्थळी उपस्थित महिलांच्या हस्ते व माँसाहेब जिजाऊ चरणी नतमस्तक होत आपले अन्नत्याग आंदोलन तूर्त स्थगित केले. बैठकीत काय निर्णय होतो हे पाहून पुढील दिशा ठरवू, जर ठोस निर्णय झाले नाही तर राज्यभर आक्रमकपणे पुन्हा रस्त्यावर उतरू, असे रविकांत तुपकर यांनी सांगितले.



मातृतीर्थ सिंदखेड राजात शेतकरी नेते रविकांत तुपकर यांचे आंदोलन गेल्या ४ दिवसांपासून सुरू होते. सोयाबीन – कापसाची दरवाढ, पीक विम्याचा प्रश्न, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, जंगली जनावरांपासून शेतीपिकांचे रक्षण यासह विविध मुद्यांवर तुपकरांनी हे आंदोलन सुरू होते. आज ७ सप्टेंबर रोजी आंदोलनाच्या चौथ्या दिवशी जिल्ह्यातल्या शेकडो गावात व राज्यातील हजारो गावांत तुपकर यांच्या समर्थनार्थ ग्रामपंचायतचे ठराव घेण्यात आले. रविकांत तुपकर यांच्या आंदोलनाला आमचा जाहीर पाठिंबा असून शासनाने शेतकऱ्यांच्या हिताच्या मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, असे ठराव विविध ग्रामपंचायतीने घेतले आहेत. तुपकरांच्या आंदोलनाचा चौथा दिवस असून त्यांची प्रकृती खालावली असतांनाही सरकार या आंदोलनाकडे दुर्लक्ष करत असल्याने कार्यकर्ते आणि शेतकरी आक्रमक झाले होते. ८ सप्टेंबर रोजी रास्तारोको आंदोलन असल्याने परिस्थिती अधिक चिघळण्याची शक्यता निर्माण झाली होती. दरम्यान आज सायंकाळी शासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी प्रा. खडसे यांनी रविकांत तुपकर यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करून खुद्द उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी आंदोलनाची दखल घेतली असून शेतकऱ्यांच्या मागण्या आणि समस्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी विशेष बैठक बोलावल्याचे सांगितले. उपमुख्यमंत्री ना.पवार यांनी रविकांत तुपकर यांना ११ सप्टेंबर रोजी मुंबई येथे बैठकीसाठी बोलावले आहे. या बैठकीचे लेखी निमंत्रण जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी खडसे यांनी रविकांत तुपकर यांना दिले.

शासनाच्या वतीने शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत चर्चा करण्यासाठी आणि निर्णय घेण्यासाठी स्वतंत्र बैठक बोलावली हे आंदोलनाच्या आणि शेतकऱ्यांच्या एकजुटीचे यश आहे. केवळ आंदोलन करणे आणि कायदा हाती घेणे हा आपला उद्देश नसून शेतकऱ्यांच्या पदरात त्यांच्या न्याय हक्क मिळवून देणे हा आपला उद्देश असल्याने आपण उपमुख्यमंत्री यांच्या बैठकीचे निमंत्रण स्वीकारून आपल्या आंदोलन तुर्तास स्थगित करत असल्याचे रविकांत तुपकर यांनी सांगितले. जिजाऊंच्या या पावनभूमीत आंदोलन स्थळी उपस्थित असलेल्या माय– माऊलींच्या हस्ते दूध घेऊन तुपकरांनी आपले अन्यत्याग आंदोलन तोडले. ११ सप्टेंबर रोजी उपमुख्यमंत्री यांच्या बैठकीत काय निर्णय होतात आणि कोणत्या कोणत्या मागण्या मार्गे लागतात हे पाहूनच पुढील निर्णय घेऊ तोपर्यंत सर्व कार्यकर्त्यांनी आणि शेतकऱ्यांनी शांत रहावे, जर ठोस निर्णय झाले नाही तर आक्रमकपणे रस्त्यावर उतरू असे रविकांत तुपकर यांनी सांगितले

### आ.डॉ.राजेंद्र शिंगणे व विविध नेत्यांची आंदोलन स्थळी भेट

राज्याचे माजी मंत्री तथा सिंदखेडराजा मतदारसंघाचे आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन रविकांत तुपकर यांच्याशी चर्चा केली. रविकांत तुपकर यांनी केलेल्या मागण्या ह्या रास्त असून याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांच्याशी चर्चा करू असे, आ.डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी यावेळी बोलतांना सांगितले. रविकांत तुपकर राज्यातील शेतकऱ्यांचा आवाज आहे, त्यामुळे त्यांनी प्रकृतीची काळजी घ्यावी, असा सल्ला देखील आ.डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी दिला. तसेच माजी आमदार तताराम कायंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रसेनजीत पाटील, नरेश शेळके,ज्योतीताई खेडेकर, प्रा.नरेश बोडखे, यांनी आंदोलन स्थळी पोचून रविकांत तुपकर यांची भेट घेतली.

## संक्षिप्त...

### राज्याचे मुख्यमंत्री पुन्हा एकनाथ शिंदेच होऊ दे, अर्जुन खोतकर यांचं गणरायाकडे साकडं




दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : राज्याचे मुख्यमंत्री पुन्हा एकनाथ शिंदेच होऊ दे, असं साकडं शिवसेना शिंदे गटाचे उपनेते अर्जुन खोतकर यांनी गणरायाच्या चरणी घातलंय –आज ढोल ताशांच्या गजरात खोतकर यांच्या घरी गणपतीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली –यावेळी खोतकर कुटुंबातील सदस्यांनी गणरायाचं स्वागत केलं.

### शहरात मोठ्या उत्साहात गणरायाचे आगमन, आगमन सोहळ्यात महिला व शालेय विद्यार्थ्यींनीचा सहभाग

**जळगाव/प्रतिनिधी** : आज सर्वत्र गणरायाचं आगमन मोठ्या उत्साहात वाजत गाजत करण्यात आले. चोपडा शहरात बालकृत गणेश मंडळाचे आगमन सोहळ्यात महिलांनी नऊवारी पैठणी परिधान करून व शालेय विद्यार्थिनींनी फेटा बांधून आगमन सोहळ्यात लेझीम खेळत, टाळ वाजवीत मोठ्या उत्साहात ढोल ताशाच्या तालावर आनंदात व उत्साहात सहभागी झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापासून आगमन सोहळ्याला प्रारंभ झाला. मुख्य रस्त्याने वाजत गाजत आगमन सोहळा संपन्न झाला. या आगमन सोहळ्यामध्ये महिलांनी व शालेय विद्यार्थ्यींनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला होता. महिलाही सण उत्सवात कुठेही कमी नाही. शिस्तबद्ध व लयबद्ध आगमन सोहळा साजरा करण्यात आला. या आगमन सोहळ्यासाठी चार दिवसांपासूनच महिलांनी तयारी केली असल्याचे यावेळी सांगितले तर काही महिला बाहेर गावाहून तर शेजारील राज्यातून आलेले दिसून आल्या.

### कुंटणखाना प्रकरणी राजकीय नेत्याला अटक; नाशिकमध्ये पोलिसांच्या कारवाईने खळबळ

**नाशिक/प्रतिनिधी** : कुंटणखाना प्रकरणी एका राजकीय नेत्याला नाशिक क्राइम ब्रँचने अटक केल्यानं खळबळ उडाली आहे. नाशिकमध्ये कुंटणखाना चालवला जात असल्याची माहिती समोर आली होती. तपोवन इथल्या एका हायप्रोफाइल सोसायटीत हा कुंटणखाना सुरू होता. नाशिक पोलिसांनी धाड टाकून या कुंटणखान्याचा पर्दाफाश करण्यात आला होता. कुंटणखाना चालवणाऱ्या महिलेच्या म ागे राजकीय वरदहस्त होता. आता थेट पोलिसांनी नेत्यालाच अटक केल्यानं मोठी खळबळ उडालीय. याबाबत मिळालेली माहिती अशी की, तपोवन इथल्या हायप्रोफाइल सोसायटीत कुंटणखाना सुरू होता. राजकीय नेत्याच्या वरदहस्ताने हा प्रकार सुरू असल्याची माहिती समजली होती. कविता साळवे पाटील नावाची महिला हा कुंटणखाना चालवत होती. तिला पवन क्षीरसागरचा सपोर्ट होता असा आरोप होत होता. या प्रकरणी पोलिसांनी पवन क्षीरसागरला अटक केलीय. पवन क्षीरसागर हा आरपीआय आठवले गटाचा उत्तर महाराष्ट्र संघटक आहे. कुंटणखाना जिथं चालू होता त्या परिसरातील नागरिकांना यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत होता. फ ेब्रुवारी महिन्यात नागरिकांनी ठिय्या आंदोलनही केलं होतं.



### कल्याणमध्ये मनसेचे अनोखे आंदोलन; गणेशाची वेशभूषा धारण करून खड्डेमय रस्त्यावर ठिय्या

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** : गणेश उत्सवाला सुरुवात झाली आहे. वारंवार मागणी करून देखील कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील रस्त्यावरील खड्डे बुजवले गेले नाहीत.

या खड्ड्यातून गणरायाचे आगमन झाले आहे. मनसेकडून कल्याणमध्ये आज अनोखे आंदोलन करण्यात आले. गणेशाची वेशभूषा धारण करून गणेश खड्डे रस्त्यावर अवतरले. त्यांनी खड्ड्यातच ठाण मांडले. यावेळी मनसे कार्यकर्त्यांनी मालवणी भाषेत देवा महाराजा हे देखील गाऱ्हाणे घातले आहे. मनसेचे जिल्हाप्रमुख उल्हास भोईर यांच्या नेतृत्वात हे अनोखे आंदोलन करण्यात आले आहे

### ''उगाच पुण्याच्या पाट्या जगभर प्रसिद्ध नाहीत!'' नो पार्किंगमध्ये गाडी लावणाऱ्यांना पुणेरी शैलीत टोला

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : पुणेकर आणि पुणेरी पाट्या यांची चर्चा जगभर होत असते. कारण पुणेकरांची शैलीच अशी आहे मग चर्चा तर होणारच! ''किम ान शब्दात कमाल अपमान'' करण्याची शैली फक्त पुणेकरांकडेच आहे असे म्हणतात. पुणेकरांना कोणालाही सल्ला द्यायचा असो किंवा सुचना त्यासाठी ही नेहमी पुणेरी शैलीच वापरली जाते. याच पुणेरी शैलीमुळे निर्माण झालेल्या पुणेरी पाट्या देखील आता जगभर चर्चेत आहेत. अनेकांना प्रश्न पडतो की, पुणेरी पाट्यांची इतकी चर्चा का होते? कारण मोजक्या शब्दात योग्य ती गोष्ट सांगण्याचे हे कौशल्य फक्त पुणेकरांकडे आणि ते फक्त पुणेरी पाट्यांमध्येच तुम्हाला पाहायला मिळते. घरात शिरणाऱ्या चोरट्यांना कुत्र्यांची भिती घालायची असो किंवा गेटसमोर बेशिस्तपणे गाडी पार्क करणारे लोक असोष्ठनियम म ोडणाऱ्यांना शिस्त लावण्याचे काम या पुणेरी पाट्या योग्यपद्धतीने करतात. सध्या सोशल मीडियावर अशाच एका पुणेरी पाटीची जोरदार चर्चा होत आहे.

नो पार्किंगमध्ये बेशिस्तपणे वाहन लावणाऱ्यांची संख्या पुण्यात दिवसेंदिवस वाढत आहे. अनेकदा येथे वाहन लावण्या सक्त मनाई आहे असा सुचना फलक लावलेला असतानाही लोक तिथेच गाडी लावून जातात. अशा बेशिस्त लोकांसाठी लावलेली एक पुणेरी पाटी सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. या व्हायरल पाटीवर नो पार्किंगचे चिन्ही दिसत आहे आणि त्याखाली लिहिले आहे की, ''रस्त्यावर वाहने लावू नयेत. हे वाचूनही बिनडोकपणे गाडी लावली तर त्या वाहनांच्या पुढील अवस्थेस आम्ही जबाबादार नसू – हुकामावरून''

पान २ वरून...

### महाराष्ट्राचा जर्मनीतील बाडेन बुटेनबर्ग राज्याशी कौशल्य वृध्दीबाबत झाला सामंजस्य करार

करुन घेईल. या संमतीपत्रात सर्वसाधारण सेवा शर्तीचा उल्लेख असावा.

जर्मनीतील यंत्रणेकडून संमतीपत्र प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थींची यादी संबंधित तांत्रिक समिती आयुक्त, कामगार यांच्याकडे देशांतराची प्रक्रिया पार पाडण्याच्या अनुषंगाने पाठवेल.

तांत्रिक समित्यांनी करावयाची उपरोक्त कामे कालबध्द स्वरुपाची आहेत. प्रत्येक कामासाठीची कालमर्यादा निश्र्चित करण्याचा निर्णय राज्यस्तरीय सनियंत्रण समितीच्या पहिल्या बैठकीत घेण्यात येईल.

**ड. देशांतराच्या अनुषंगाने करावयाची कृती :–**

प्रशिक्षणार्थींचा पासपोर्ट, व्हिसा व अन्य आवश्यक कागदपत्रे यांच्या पूर्ततेसाठी निश्र्चित अशी पध्दती आयुक्त, कामगार यांच्यामार्फत तयार केली जाईल व यासाठी ते त्यांच्या जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांना विशिष्ट अशा जबाबदाऱ्या आदेश निर्गमित करुन सोपवू शकतात.

जर्मनीत पोहोचल्यानंतर उमेदवार योग्य प्रकारे स्थिरस्थावर होतील यासाठी तेथील संबंधित यंत्रणेशी समन्वय साधून व त्यांच्या सहकार्याने आवश्यक ती उपाययोजना करण्याची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची असेल. यासाठी आवश्यकता भासल्यास जर्मनीतील बृहन्महाराष्ट्र मंडळाची मदत घेण्यात यावी.

**३. सर्वसाधारण तरतुदी :–**

जर्मनी येथे काम करत असताना अपघात वा अन्य कोणत्याही कारणामुळे अपंगत्व, कायमस्वरूपी अपंगत्व अथवा मृत्यू झाल्यास संबंधित व्यक्तीस अथवा त्याच्या कुटुंबाचे कोणतेही आर्थिक दायित्व महाराष्ट्र शासनावर असणार नाही. तशा आशयाचे बंधपत्र उमेदवारास अंतिम निवडीनंतर सादर करणे आवश्यक राहील. ज्या कंपनीत संबधित व्यक्ती कामास असेल व त्याच्या नियुक्तीच्या अटी व शर्तीमध्ये नुकसान भरपाईच्या अटीचा समावेश असेल तर अशी नुकसान भरपाई मिळवून देण्यात सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल.

या पथदर्शी प्रकल्पाचा लाभ राज्यातील सर्व जिल्ह्यातील गरजू व इच्छुक कौशल्य धारकांना मिळेल याबाबत संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांनी दक्षता घ्यावी.

या शासन निर्णयामुळे राज्यातील कुशल मनुष्यबळासाठी जर्मनीतील बाडेन वुटेनबर्ग राज्यात रोजगार पुरविण्याची हमी देण्याचे दायित्व शासनावर असणार नाही.

**वित्तीय भार :–**

या प्रकल्पाचा वित्तीय भार खालीलप्रमाणे आहे,

जर्मन भाषेचे प्रशिक्षण–प्रति व्यक्ती रु.३३,०००/– –एकूण खर्च रु.३३.०० कोटी

जर्मन भाषा प्रशिक्षण वर्ग खोल्यांची सूविधा (एकूण २०० वर्गासाठी)–प्रति वर्ग रु.१.५० लक्ष–एकूण खर्च रु.३.०० कोटी

कौशल्य वृध्दीसाठी अतिरिक्त प्रशिक्षण–ग्रामीण भाग–प्रति व्यक्ती प्रति महिना रु.७,०००/– शहरी भाग प्रति व्यक्ती रु.१०,०००/– एकूण खर्च रु.४०.०० कोटी (प्रशिक्षण कालावधी ४ महिन्यांचा गृहित धरण्यात आला आहे.) प्रस्तावाचा एकूण खर्च रु.७६.०० कोटी अंदाजे इतका आहे.या योजनेसाठी परिगणना करण्यात आलेला एकूण अंदाजे खर्च रु.७६.०० कोटी यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यापैकी रु.४०.०० कोटी इतका निधी पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन दिला जाणार असून उर्वरित रु.३६.०० कोटी इतका निधी संबंधित लेखाशीर्षाखाली करण्यात आलेल्या मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीतून उपलब्ध होणार आहे. जर्मनीस कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करण्याच्या अनुषंगाने संदर्भाधीन दि.३१ मे २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या कृतीदलात उद्योग, कृषी, वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, कौशल्य विकास व उद्योजकता या विभागांच्या मंत्री महोदयांचा व सचिवांचा समावेश आहे. या कृतीदलाच्या वेळोवेळी संपन्न झालेल्या बैठकांसाठी मंत्री (कामगार) व प्रधान सचिव, कामगार विभाग यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून उपस्थिती दर्शविली आहे.

या कृतीदलाच्या निर्णयानुसारच जर्मनीतील बाडेन वुटेनबर्ग या राज्याशी सामंजस्य करार करण्यात आला आहे. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखालील शिष्टमंडळाने दि.११ ते १५ जून, २०२४ या कालावधीत बाडेन वुटेनबर्ग या राज्याच्या केलेल्या दौऱ्यात उपरोक्त बहुतांशी विभागांच्या आयुक्त/संचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांचा समावेश होता. थोडक्यात हा प्रकल्प या सर्व विभागांचा संयुक्त प्रकल्प आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०७१११५१५४५५८२१ असा आहे. तरी इच्छुक व गरजू उमेदवारांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## युवकांच्या पुढाकारने तलावाची स्वच्छता

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** : भर जहागीर जन्मभूमी असलेले मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठाचे न्यायधिश गोविंदराव सानप यांनी आसरा माता मंदिर परीसराला भेट दिली आसता तलावाच्या स्वच्छतेचा विषय काढला आणि गावातील युवकांनी पुढाकार घेत तलाव स्वच्छ केला आहे.



रिसोड – तलावातील जलपर्णी व इतर वनस्पती काढत असताना भरजागीर येथील युवक

रिसोड ते लोणार मार्गावर भर जहागीर नजिक आसरामाता मंदिर,जगदंबामाता मंदिर परीसरामध्ये मणमोहक तलाव आहे.येथे न्यायधिश सानप साहेब सपत्नीक सतत येत आसतात नुकतीच त्यांनी आसरा माता मंदिराला भेट दिली आसता तलावातील वाढती जलपर्णी वनस्पती विषयी चिंता व्यक्त करताच भर जहागीर येथिल करण सांगळे,मेघशाम सांगळे,विशाल काळबांडे,शिवाजी घुले,अनिल नागरे, महादेव घुगे, वेदांत गिते, भानुदास गिते, विजय चोपडे,यांनी पुढाकार घेत तलावातील मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली जलपर्णी,बेशरमसह विविध प्रकारचा कचरा बाहेर काढला,त्यामुळे तुडुंब भरलेल्या तलावाचे सौंदर्य अबाधित राहीले,मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपिठाचे न्यायधिश गोविंदराव सानप यांचे मुळ गाव भर जहागीर आहे,त्या अनुशंगाने मागील वर्षाममध्ये आसरा माता तलाव परीसरातील शेकडो झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले आसुन प्रत्येक वृक्षाचे योग्य संगोपण करण्यासाठी तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर यांच्या नेतृत्वात स्थानिक ग्रामपंचायत, महसुल विभागातील कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले,आज शेकडो वृक्षाचे योग्य संगोपण केल्याने तलाव परीसराच्या सौंदर्यामध्ये वाढ झाले आहे.

**आसरामाता,जगदंबामाता मंदिर परीसरातील सभामंडप,भक्तनिवास,मंदिराचे पुर्ण कामासाठी एस.जी. जाधव कंत्रक्शनचे मालक एस.जी.जाधव यांचा मोलाचा वाटा आहे.मंदिराच्या कुठल्याही विकास कामाला एस.जी.जाधव यांचा पुढाकार आसतो हे विशेष.**

## वृत्तविशेष...

### आमदार संजय गायकवाड यांच्या कार्यालयामध्ये लाडक्या गणरायाचे आगमन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : श्री गणेश चतुर्थीच्या मंगल पर्वावर सर्वत्र गणरायाचे मोठ्या जल्लोषात आगमन होत आहे..बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्या शिवसेना मातोश्री जनसंपर्क कार्यालय येथे भक्तिमय वातावरणात आणि आनंदाने लाडक्या बाप्पांचे आगमन झाले. यावेळी सर्व उपस्थित मित्रपरिवारासोबत श्री गणरायाचा जयघोष करत गणपतीची प्रतिष्ठापना केली.

### मला मतदारसंघात अडकवण्यासाठी..; रोहित पवारांचा विरोधकांवर जोरदार हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**अहमदनगर/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आमदार रोहित पवार यांनी पुन्हा एकदा विरोधकांवर जोरदार निशाणा साधला आहे. महाराष्ट्रात गलिच्छ राजकारण सुरू आहे, मला मतदारसंघामध्ये अडकवण्यासाठी राज्यातील मोठे नेते मैदानात उतरले आहेत असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

नेमके काय म्हणाले रोहित पवार?

रोहित पवार यांनी पुन्हा एकदा विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. मला मतदारसंघात अडकवण्यासाठी राज्यातील मोठमोठे नेते कामाला लागले असून, त्यांना उत्तर याच मतदारसंघातील जनता देईल असं रोहित पवार यांनी म्हटले आहे. रोहित पवार यांच्या मतदारसंघामध्ये आज निष्ठावंत कार्यकर्त्यांनी मिळून स्वाभिमान यात्रा काढली आहे यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, ही संकल्पना कार्यकर्त्यांची असून त्याचा मी आदर करतो, ही स्वाभिमान यात्रा कर्जत जामखेड मतदारसंघातील प्रत्येक गावा गावात जाणार असून त्या ठिकाणी शिक्षण स्वच्छता आणि पाच वर्षात केलेल्या कामांची माहिती ग्रामस्थांना सांगणार आहे. या यात्रेला श्री शेत्र सिद्धिविनायक मंदिर येथून सुरुवात करण्यात आली आहे, ही निवडणूक जरा वेगळी असून महान व्यक्तींच्या विरोधात यावेळी लढत होणार आहे, त्यांच्यामागे राज्यसह केंद्राची ही ताकद उभी राहणार आहे. तर माझ्या वतीने ही निवडणूक कार्यकर्त्यांनी हाती घेतली असून त्यांच्याच बळावर येणाऱ्या काळात मी निवडणूक लढवणार असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

### मुलुंडमध्ये हिट अँड रन, गणेश मंडळाच्या दोन कार्यकर्त्यांना उडवलं, एकाचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : गणेशोत्सावानिमित्त सगळीकडे उत्साहाचं वातावरण आहे. बाप्पाच्या आगमन आज होत आहे. दरम्यान, मुलुंडमध्ये मुलुंडचा राजा गणपती मंडळाच्या दोन कार्यकर्त्यांना बीएमडब्ल्यू कारने धडक दिल्याची घटना घडलीय. यात एकाचा मृत्यू झाला असून दुसऱ्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आलीय. कारने धडक दिल्यानंतर कार चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे.

मुलुंडचा राजा गणपती मंडळाच्या मंडपाची तयारी कार्यकर्ते करत होते. पहाटे चारच्या सुमारास प्रीतम थोरात आणि प्रसाद पाटील हे बॅनर लावत होते. त्यावेळी भरधाव कारने दोघांना जोराची धडक दिली. ही कार कँपस हॉटेलकडून मुलुंड पूर्व ते वेस्टच्या ब्रीजकडे निघाली होती.

अपघातानंतर कार चालक न थांबता मुलुंड पश्चिमच्या दिशेने गेला. अपघातात प्रीतम थोरातचा मृत्यू झाला तर प्रसाद पाटील याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आलीय. घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून अधिक तपास करत आहेत.गणेशोत्सावाचा उत्साह बघायला मिळत असतानाच अपघाताच्या या घटनेमुळे मुलुंडचा राजा गणपती मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरलीय. गणेश चतुर्थीच्या दिवशीच घडलेल्या या हिट अँड रनने खळबळ उडालीय. चालकाने दोघांना धडक दिल्यानंतर तिथून पलायन केलं. पोलीस आता चालकाचा शोध घेत आहेत.

### पुण्यातील मानाच्या पहिल्या गणपतीचे धुमधडाक्यात आगमन; प्रतिष्ठापना संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : दरवर्षी मानाच्या गणपतींच्या दर्शनासाठी शेकडो भाविक पुण्यात दाखल होतात. पुण्यात मानाच्या पहिल्या कसबा गणपतीची प्रतिष्ठापना झाल्यानंतरच इतर बाप्पांची प्रतिष्ठापना केली जाते.

शिवकालीन परंपरा असलेल्या मानाच्या पहिल्या कसबा गणपतीची मूर्ती यंदा पुण्यातील रास्ता पेठेतून पारंपरिक चांदीच्या पालखीतून विराजमान करण्यात आली. सनई-चौघडे, बँड पथक आणि ढोल-ताशा पथकांच्या निनादात भव्य मिरवणुकीतून या बाप्पाचे आगमन झाले. अष्टविनायकांपैकी एक असलेल्या श्रीक्षेत्र सिद्धटेक देवस्थानच्या प्रतिकात्मक मंदिरात श्री कसबा गणपती विराजमान झाला आहे. ७ सप्टेंबर रोजी सकाळी ११:४५ वाजता कोल्हापूरच्या श्री सिद्धगिरी मठाचे मठाधिपती आणि विश्वस्थ अदृश्य कांड सिद्धरश्वर यांच्या हस्ते मूर्तीची प्रतिष्ठापना झाली. आता कसबा मंडळाच्या वतीने महिलांसाठी १० दिवस विविध समाजपयोगी उपक्रम राबवले जाणार आहेत.

# प्रकाश डोंगरे विधानसभेच्या रिंगणात

## स्थानिक असल्यामुळे जनसंपर्क दांडगा; २०१४ पासून युवा सेनेचे सक्रिय काम

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर विधानसभा निवडणुकीत आता प्रकाश डोंगरे सुद्धा रिंगणात उतरणार असून उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून प्रबळ इच्छुक असून त्या संदर्भात त्यांनी जनसंपर्क सुद्धा सुरू केला आहे प्रकाश डोंगरे २०१४ पासून युवा सेनेचे सक्रिय काम करत आहेत युवा नेतृत्व असून राजकारणाची संपूर्ण माहिती आहे तर मेहकर तालुक्यातील देऊळगाव माळी येथील रहिवासी असून मेहेकर मतदारसंघातीलच उमेदवार असल्याने मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळण्याची शक्यता जाणवत आहे.



महाविकास आघाडीमध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून तिकीट मिळावे यासाठी अनेक हौसे - नवसे मातोश्रीवर जाऊन शिवबंधन बांधत आहेत केवळ मेहकर विधानसभेवर डोळा ठेवून ऐन निवडणुकीच्या तोंडावरच अनेक जण उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटात प्रवेश घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

मात्र प्रकाश डोंगरे हे निष्ठावंत शिवसैनिक आहेत शिवसेनेमध्ये दोन गट पडल्यानंतरही प्रकाश डोंगरे हे उद्धव बाळासाहेब गटाकडेच कायम राहिले व आजपर्यंत त्यांची वाटचाल यशस्वीपणे सुरू आहे मेहकर मतदार संघात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटात इच्छुकांनी भेटीगाठी, प्रचाराचा जोर धरला आहे. शिवसेनेत फूट पडल्यानंतर बुलढाणा जिल्ह्यात काही मोजके शिवसैनिक उद्धव बाळासाहेब सेने सोबत एकनिष्ठ राहिले, पक्षाचे संघटन मजबूत करणे करून ,पक्ष वाढीसाठी प्रयत्न केला त्यामध्ये युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रकाश डोंगरे यासह अनेक शिवसैनिक आजही उद्धव बाळासाहेब ठाकरे सेने सोबत एकनिष्ठ आहेत.. उद्धव ठाकरे पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले पाहिजे.

या एका निश्चयावर प्रत्येक निष्ठावंत शिवसैनिक पक्षासाठी झटून काम करत आहे. बुलढाणा जिल्हा युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रकाश डोंगरे हे सातत्याने मागील १० ते १२ वर्षांपासून शिवसेनेसोबत एकनिष्ठ आहेत. पक्षाचे मेळावे ,बैठका, मोर्चे आंदोलन उपोषण यासह जनहिताचे कुठले कार्यक्रम असतील. पक्षाने दिलेली जबाबदारी असेल अतिशय सक्षमपणे सांभाळण्याचं काम प्रकाश डोंगरे यांनी मागील काळात केलेली आहे व सातत्याने करत आहे.

डोंगरे मेहकर विधानसभा लढवण्यासाठी इच्छुक असून मतदाराची जनसंपर्क करीत आहेत राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्ट्या त्यांचा चांगला अभ्यास आहे मेहकर तालुक्यातील देऊळगाव माळी गावातील ते रहिवासी असून विविध उद्योग व्यवसाय सोबत ते राजकारणातही सक्रिय आहे .अनेकांसोबत असलेला दांडगा जनसंपर्क मैत्रीचा 'बहर'निर्माण करणारे व्यक्तिमत्व प्रकाश डोंगरे येणाऱ्या मेहकर विधानसभा निवडणुकीत आपले भाग्य आजमावत आहे.

प्रकाश डोंगरे हे मुंबईत अग्निशामक दलात सेवा करत असताना महानगरपालिकेच्या माध्यमातून आदित्य ठाकरे यांच्यासोबत त्यांची नेहमी उठबस असल्यामुळे मातोश्रीवर वरिष्ठांसोबत त्यांचे घनिष्ठ संबंध आहेत. मागील आठवड्यात पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत मातोश्रीवर त्यांची शिवसेनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यासह महत्त्वपूर्ण बैठक होती प्रकाश डोंगरे हे मागील बारा वर्षापासून पक्ष संघटन वाढीसाठी प्रयत्न करत आहेत.

मेहकर विधानसभा लढवण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेने गटाकडून प्रकाश डोंगरे इच्छुक आहेत मेहकर मतदार संघातील जनतेच्या मनात 'स्थानिक' उमेदवार अपेक्षित असून प्रकाश डोंगरे हा तरुण शासकीय नोकरी सोडून राजकारणामध्ये येऊन गोरगरीब, विद्यार्थी, तरुण व सर्व सामान्य जनतेला कायम मदतीचा हात पुढे करणारा 'समाजकारणी'म्हणून त्यांची तालुक्यात ओळख आहे.

## शेतकऱ्यांना व सर्वसामान्यांना चांगले दिवस येऊ दे - केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : शेतकऱ्यांना व गोरगरिबांना चांगले दिवस येऊ दे महाराष्ट्र मध्ये पुन्हा महायुतीचे सरकार बहुमताने येऊ दे शेतकऱ्यांचे चांगले कर असे साकडे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी गणराया समोर घातले केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या निवासस्थानी आज गणेशोत्सवानिमित्त गणरायाचे आगमन झाले. सहकुटुंब विधिवत पूजन करून विघ्नहर्ताचे प्रतापराव जाधव यांच्या परिवाराने सहर्ष स्वागत केले. गणेश भक्ताच्या जीवनातील दुःख नाहीये होऊन देशातील जनता सुखी समृद्ध आणि निरोगी आयुष्य मिळू दे ....बळीराजाला चांगले दिवस येऊ दे असे साकडे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी गणरायाच्या चरणी घातले. गणरायाची विधिवत पूजाअर्चा केली यावेळी त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी राजश्री जाधव मुलगा ऋषिकेश जाधव सून मयुरी नातू रणविर आणि पुतण्या धिरज जाधव असा आप्त परिवार होता....

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या निवासस्थानी गणरायाचे आगमन



## कालव्याचे पाणी शेतात साचल्यामुळे उभ्या पिकाचे नुकसान; शेतकरी चिंताग्रस्त, नुकसान भरपाईची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** :कालव्याचे पाणी शेतात घुसून साचल्यामुळे उभ्या पिकाचे मोठे नुकसान झाले आहे संबंधित विभागाने शेतीची पाहणी करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्याने तहसीलदार रिसोड व अभियंता लघु पाटबंधारे उपविभाग क्र. ६ (बांधकाम ) रिसोड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की भोकरखेड येथील शेतकरी प्रभू संभाजी रंजवे यांची भोकरखेड शेत शिवारात गट नं. ५९ मध्ये २.०२ आर शेती आहे जवळच असलेल्या पळसखेड येथील लघु पाटबंधारे धरणाचा डावा कालवा या शेतामधून गेला आहे या धरणाच्या दोन्ही कालव्याचे काम अर्धवट झालेले आहे रंजवे या शेतकऱ्याच्या शेतातून गेलेल्या डाव्या कालव्याचे खोदकाम एल या इंग्रजी अक्षरा प्रमाणे केलेले आहे त्यामुळे त्यांच्या शेतात आज रोजी अडीच ते तीन फूट पाणी साचले आहे सतत पाणी साचून राहिल्यामुळे उभे पीक सडून गेले आहे तशेच कालव्याचे काम हि अर्धवट झालेले आहे पावसाळ्यापूर्वी शेतकऱ्यांनी संबंधित विभागाच्या अभियंत्याला व ठेकेदाराला वारंवार सांगूनही त्यांनी या कामाकडे दुर्लक्ष केले कालव्याचे पाणी शेतात साचल्यामुळे संपूर्ण शेतातील सोयाबीन व तूर या उभ्या पिकाची नासाडी झाली आहे झालेल्या नुकसानीला संबंधित विभाग जबाबदार असल्याचा आरोप शेतकरी प्रभु रंजवे यांनी केला आहे नुकसानग्रस्त शेतीची संबंधित विभागाने पाहणी करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी प्रभू संभाजी रंजवे यांनी तहसीलदार रिसोड व अभियंता लघु पाटबंधारे उपविभाग क्र. ६ (बांधकाम) रिसोड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## 'लाडकी बहीण योजना' अर्ज प्रक्रियेत मोठा बदल; आता फक्त 'या' कर्मचाऱ्यांना दिले स्वीकारण्याचे अधिकार!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्य सरकारने महिला सक्षमीकरणासाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरु केली आहे. या योजनेचा लाभ राज्यातील लाखो महिलांना होणार आहे. या योजनेसाठी आतापर्यंत लाखो महिला पात्र ठरल्या आहेत. माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून राज्य सरकार लाभार्थी महिलांना प्रत्येक महिन्याला १ हजार ५०० रुपये त्यांच्या खात्यावर जमा करणार आहे. या योजनेचा पहिला आणि दुसरा हप्ता काही महिलांच्या खात्यावर जमा झाल्याची माहिती देण्यात आली आहे.

महाराष्ट्रात १ जुलै २०२४ पासून 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' ही योजना सुरू करण्यात आली. तेव्हापासून या योजनेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी राज्य सरकारने या योजनेसाठी अर्ज दाखल करण्याची मुदतही वाढवली होती. आता या योजनेबाबत एक महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या अर्ज करण्याच्या प्रक्रियेत आता महत्वाचा बदल करण्यात आला आहे.

यापुढे फक्त आंगणवाडी सेविकांकडेच अर्ज करता येणार आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज फक्त अंगणवाडी सेविकांकडून मंजूर करण्यात येणार असल्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. म



हिला व बाल विकास विभागाकडून यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला असल्याची माहिती देण्यात आली आहे.

शासन निर्णयात काय म्हटले आहे?

राज्य सरकारच्या महिला व बालविकास विभागाने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'च्या अर्जाच्या प्रक्रियेसंदर्भातील घेतलेल्या निर्णयानुसार, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेंतर्गत राज्यातील सर्व महिला लाभार्थ्यांना सप्टेंबर २०२४ मध्येही या योजनेंतर्गत नोंदणी सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेसाठी आधी नागरी व ग्रामीण भागातील बालवाडी सेविका अंगणवाडी सेविका, समूह संघटक-CRP (NULM, MSRLM Je MAVIM)'', मदत कक्ष प्रमुख, उचच (उळीं चळीीळेप चरपरसशी). आशा सेविका, सेतू सुविधा केंद्र, आंगणवाडी पर्यवेक्षिका, ग्रामसेवक व आपले सरकार सेवा केंद्र यांना अर्ज स्विकारण्यास प्राधिकृत करण्यात आलं होतं. मात्र, सरकारच्या नव्या निर्णयानुसार आता अंगणवाडी सेविका व्यतिरिक्त इतर सर्व प्राधिकृत व्यक्तिना अर्ज स्विकृतीचे देण्यात आलेले अधिकार रद्द करण्यात आले आहेत. या निर्णयानुसार, आता फक्त अंगणवाडी केंद्रात अंगणवाडी सेविकामार्फत अर्ज स्विकारण्यास मान्यता देण्यात आली आहे.

### पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांच्या बदलीला स्थगिती

**पुणे/प्रतिनिधी** : मुदतपूर्व बदली झाल्याने पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी तातडीने केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण (कॅट) मध्ये धाव घेतली. त्यांच्या अर्जाची तातडीने सुनावणी होऊन न्यायाधिकरणाचे सदस्य न्यायमूर्ती एस. जी. सेवलीकर आणि संतोष मेहरा यांनी बदलीला स्थगिती दिली आहे. या आदेशानंतर पुढील सुनावणी होईपर्यंत पंकज देशमुख पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत राहणार आहेत.

# पत्रकाराला उद्धट भाषेत बोलणाऱ्या ठाणेदारावर कारवाई करा

## पत्रकार संघटनेची जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे मागणी

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**सिंदखेडराजा :** सिंदखेडराजा तालुक्यातील मलकापूर पांग्रा येथे ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त शांतता समितीच्या बैठकीमध्ये साखरखेर्डा ठाणेदारांनी पत्रकाराशी अरेरावी आणि उद्ठपणाची भाषा वापरून अपमानित केले मलकापूर पांगरा येथील पत्रकार व गणेश उत्सव मंडळाचे पाच वर्षे अध्यक्ष असलेले तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये मुस्लिम असून सुद्धा नेहमी सहभाग नोंदविणारे यांच्या बाबत केलेले चुकीचे वक्तव्य ठाणेदार यांच्यामुळे सामाजिक तेढ निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही वादग्रस्त वक्तव्यामुळे शांतता समिती बैठकीमधील अशा वर्तनामुळे शांतते ऐवजी सामाजिक अशांतता निर्माण होण्याची जास्त शक्यता दिसून येत असल्यामुळे ठाणेदार गजानन करेवाड यांची यासंदर्भात तात्काळ बदली करण्याची मागणी करून व चौकशी करून ठाणेदार करेवाड यांच्यावर कठोर कारवाई करावी करण्याची मागणी सिंदखेडराजा तालुक्यातील पत्रकार संघटनेच्या वतीने एका निवेदनाद्वारे जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे केली आहे या संदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की



६ सप्टेंबर रोजी मलकापूर पांग्रा तालुका सिं.राजा येथे ईद-ए-मिलादुन्नबी सणानिमित्त शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी साखरखेर्डा पो.स्टे.चे ठाणेदार गजानन करेवाड यांनी त्या ठिकाणी चर्चा करतांना चे पत्रकार फकीरा पठाण यांना एकेरी संबोधून अत्यंत खालच्या पातळीवर अरेरावीची आणि उद्धटपणाची भाषा वापरून गावातील व्यक्तींसमोर अपमानीत केले. यासंदर्भात पत्रकारांनी त्यांच्याशी तुमचं हे बोलणं बरोबर नव्हतं असे सांगीतले असता त्यांनी आमचे म्हणणे न ऐकता, तुम्हाला काय करायचे ते करून घ्या व मी तक्रारी ला घाबरत नाही असे सांगितले त्यामुळे सदर ठाणेदारावर तात्काळ कठोर कारवाई करावी अशी मागणी पत्रकार दीपक नागरे, भगवान साळवे, वसीम शेख, कासिम शेख, सचिन खंडारे, विठ्ठल देशमुख, बाजीराव वाघ, समीर कुरेशी, वसीम शेख, अमोल साळवे, पवन मगर, रमेश कोंडाणे, गुलशेर शेख, इसाक कुरेशी, गजानन काळुसे, फिरोज शेख, भगवान नागरे, अशोक इंगळे, गणेश पंजरकर, अफरोज शेख ,यांनी केली आहे